शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड या संस्थेकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार आवश्यक शिक्षकीय पदे निर्माण करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१४/प्र.क्र.४०/१४/तांशि-५,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ जानेवारी, २०१८

संदर्भ :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टिईएम-२००७/(३०२/०७)/तांशि-१, दिनांक ३०/०६/२००७.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.९(२)/तंशिसं/ २०१३-१४/१३७, दिनांक १/०४/२०१४ रोजीचे पत्र.

३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.९(२)/तंशिसं/ २०१५/१४०, दिनांक ३०/०४/२०१५ रोजीचे पत्र.

४) वित्त विभाग उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनाक २६ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.६५/१७/आ.पु.क., दि.०७/११/२०१७.

प्रस्तावना :-

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड या संस्थेमध्ये सन २००७-०८ पासून इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन हा पदवी अभ्यासक्रम प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेने सुरू करण्यात आलेला आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे नव्याने १८ शिक्षकीय पदे सुरू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने सदर संस्थेमध्ये १८ शिक्षकीय पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेने मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीसमोर ठेवण्यात आला. त्यास अनुसरून उच्चस्तरीय सचिव समितीने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे १८ शिक्षकीय पदे नियमित स्वरुपात निर्माण करण्यास दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या क्र.४/२०१७ व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. उक्त बाबींचा सर्वागिण विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

उच्चस्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक २६/१०/२०१७ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड या संस्थेमध्ये पुढीलप्रमाणे १८ शिक्षकीय पदे भरण्याबाबत याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रु.)	मंजूर करण्यात आलेल्या पदांची संख्या
१	प्राध्यापक इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.१००००	०२
२	सहयोगी प्राध्यापक इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	०३
३	सहायक प्राध्यापक इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ६०००	११
४	सहायक प्राध्यापक गणित	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ६०००	०१
५	सहायक प्राध्यापक इंग्रजी	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ६०००	०१
		एकूण	**१८**

२. वर नमूद पदांपैकी अ.क्र. १ व २ येथील पदांच्या निर्मितीकरीता मंत्रीमंडळाची मान्यता स्वतंत्ररित्या घेण्यात येत आहे. ती प्राप्त झाल्यानंतर ती पदे निर्माण झाल्याचे समजण्यात येईल.

३. सदरचे पदनिर्मितीकरीता आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनात विहीत मार्गाने करण्यात येईल याचे अधिन राहून पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. ही पूरक मागणी मंजूर झाल्याखेरीज या पदांवरील खर्च करण्यात येवू नये.

४. हे आदेश वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१७०/आ्पुक, दिनांक २५/०४/२०१७ आणि दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या क्र.४/२०१७ व्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०६१५०४५८४७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2018.01.06 15:18:55 +05'30'

(अ. र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,
३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर / मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
५. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
८. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड,
९. वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-१/३/४, मंत्रालय, मुंबई,
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.